REGISTERED No. B. 3431




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ | पुणें, बुधवार तारीख १ फेब्रुवारी, १९५० | अंक ५

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९२९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )
★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेंचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.
के. डी. शिराळकर, मॅनेजर

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ४१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४३,००,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. ग. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.—

ब्रँच सेक्रेटरी

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा.

ब्रँच से

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.


## विविध माहिती

**कोको–चॉकोलेटला संरक्षण**—कोको चॉकलेटच्या धंद्याला दिलेलें संरक्षण ता. ३१ मार्च १९५० रोजीं संपत होतें. ह्या धंद्याबाबत टॅरिफ बोर्डानें केलेल्या शिफारसी स्वीकारून ता. ३१ मार्च १९५२ पर्यंत धंद्याला दिलेल्या संरक्षणाची मुदत वाढविण्यांत आली आहे. अशा रीतीनें ह्या धंद्याची वाढ करण्यास आणखी दोन वर्षांचा अवधि मिळाला आहे.

**मोटारींच्या भोंग्याचा त्रास कसा थांबवावा**—मोठमोठ्या शहरांतील रस्त्यांतून कांहीं कारणानें वहातुकींत अडथळे उत्पन्न झाले, म्हणजे मोटारींच्या रांगा लागून रहातात; आणि त्यांतील कांहीं अधीर मोटारवाले एकसारखा भोंगा वाजवून शांततेचा भंग करतात. ह्यावर उपाय म्हणून न्यूयॉर्क येथें असें सुचविण्यांत आलें आहे कीं मोटारी पळत असतांनाच भोंगे वाजावे अशी मोटारींतील तारांची जुळणूक करण्यांत यावी.

**सोन्याच्या विक्रीवर कर**—मध्यभारत सरकारच्या प्रदेशांत आयात होणाऱ्या सोन्यावरील व चांदीवरील जकात ता. १ एप्रिल १९५० पासून रद्द करण्याचें ठरविण्यांत आलें आहे असें समजतें. ह्या जकातीऐवजीं सोन्याचांदीच्या खरेदी–विक्रीवर कर बसविण्याचा विचार तें सरकार करीत आहे.

**सर्वोदय संस्थेसाठी कर्ज**—महाबळेश्वर येथील महात्मा गांधी सर्वोदय संस्थेसाठी मालवाहू मोटारी घ्यावयाच्या आहेत. [त्या]साठीं मुंबई सरकारनें २८,६०० रुपये कर्ज मंजूर केलें आहे [अ]सें समजतें. ह्या कर्जावर ३½ टक्के व्याज घेण्यांत येणार असून १० सारख्या हप्त्यांनीं त्याची फेड करावयाची आहे. कर्जाची फेड झालेली नाहीं तोंपर्यंत संस्था ३ टक्क्यांपेक्षा अधिक नफा वांटणार नाहीं.

**डॉलर्स मिळविण्यासाठी प्लॅस्टिकचे सांगाडे**—इस्पितळें आणि इतर तत्सम शिक्षण संस्थांतून मानवी सांगाड्यांची आवश्यकता लागते. शरीरशास्त्र शिकविणाऱ्या अशा संस्थांना प्लॅस्टिकचे सांगाडे पुरविण्यास ब्रिटननें प्रारंभ केला आहे. डॉलर्स चलन असलेल्या देशांत ब्रिटन जो माल निर्यात करतें त्यांत प्लॅस्टिकच्या 'हाडां'चे सांगाडे ही एक चमत्कारिक चीज आहे.

**श्री. जे. सी. महिंद्र ह्यांचा मृत्यू**—सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. जे. सी. महिंद्र आपल्या वयाच्या ५८ व्या वर्षी निधन पावले. ते एकाकाळीं हिंदुस्थान–सरकारचे पोलाद नियंत्रक म्हणून काम करीत होते. त्याशिवाय टाटा स्टील कॉर्पोरेशन आणि मार्टिन बर्न कंपनी, ह्यांच्याशींही त्यांचा संबंध आलेला होता.

**बँक ऑफ बिकानेरचा नफा**—ता. ३१ डिसेंबर १९४९ रोजीं पुऱ्या झालेल्या नऊ महिन्यांत बँक ऑफ बिकानेर लि. नें ६,३५,२४० रुपये निवळ नफा मिळविला. त्यापूर्वीच्या बारा महिन्यांत बँकेनें ८,१२,४५९ रुपये नफा कमावला होता.

**शिवणाच्या यंत्रांच्या धंद्याला संरक्षण**—शिवण्याचीं यंत्रें तयार करण्याच्या धंद्याचें संरक्षण ३१ मार्च १९५३ पर्यंत वाढविण्यांत आलें आहे. सध्या ब्रिटनहून आयात होणाऱ्या यंत्रांच्या किंमतीवर २४ टक्के आणि अमेरिकेहून येणाऱ्या यंत्रांच्या किंमतीवर ३६ टक्के संरक्षक आयात जकात घेतली जाते.

**खेडेगांवांसाठी बँकेची सोय**—खेडेगांवांतील लोकांना बँकेची सोय उपलब्ध करून देण्यासाठीं बँक ऑफ पतियाळा ही बँक लवकरच एक फिरती बँक चालू करणार आहे. त्यासाठीं बंदुकीच्या गोळ्यांना दाद न देणारी आणि संरक्षित टायर्स असलेली एक मोटार विकत घेण्यांत येणार आहे. ही मोटार गांवोगावीं हिंडून बँकेचे व्यवहार करणार आहे.

**सह्याद्री विमा कंपनी लि. नाशिक**—१९४९ सालीं ह्या कंपनीनें ४८, ५५, २११ रुपयांचीं नवीन विमापत्रकें दिलीं. पूर्ण केलेल्या धंद्याचा हा आकडा १९४८ सालापेक्षां ७ लाखांनीं अधिक आहे. देशांत एकंदरीनें मंदीचें वातावरण पसरत चाललें असतांना कंपनीनें आपल्या नवीन धंद्यांत मागील सालापेक्षां जवळ जवळ वीस टक्के अधिक भर घातली हें विशेष होय.

**पाकिस्तानांतील भांडवलाची निर्मिती**—१९४९ च्या सप्टेंबर अखेरपर्यंत १२ महिन्यांत पाकिस्तानांत ११९ नव्या कंपन्यांची नोंद करण्यांत आली. त्या सर्वांचें मिळून भांडवल १२·७० कोटी रुपये आहे. १९४८ च्या जुलै ते सप्टेंबर ह्या कालांत ७५ नव्या कंपन्यांची नोंद झाली होती व त्यांचें भांडवल ११ कोटी रुपयांचें होतें. १९४९ च्या जानेवारी ते जून ह्या कालांत ७६ कोटी रुपये भांडवलाच्या ५९ कंपन्या नोंदल्या गेल्या. जुलै ते सप्टेंबर १९४९ मध्यें १·४५ कोटी रुपये भांडवलाच्या अवघ्या २७ कंपन्या नोंदल्या गेल्या. ह्या उतरत्या भांजणीवरून पाकिस्तानांत औद्योगिक भांडवल पुढें येण्यास बिचकत आहे असें वाटतें.


# पूर्व खानदेश मध्यवर्ती सहकारी बँक लि०

मुख्य कचेरी— जळगांव

तारेचा पत्ता : EKCOBANK | टेलिफोन नं. ५४

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ९,१३,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. ९,३४,०३६ |
| इतर फंडस | रु. ५,८९,२६१ |
| ठेवी | रु. १,३८,३०,१९५ |
| खेळतें भांडवल | रु. १,९३,७१,६६० |

—० सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात ०—

शाखा:- ( १३ )

अंमळनेर, भुसावळ, बोदवड, चाळीसगांव, चोपडा, धरणगांव, एरंडोल, फैजपूर, जामनेर, पाचोरा, पारोळा, रावेर, यावल.

उपशाखा:- ( ६ )

भडगांव, एदलाबाद, नशिराबाद, सावदा, शेंदुर्णी, वरणगांव.

व्ही. आर. शिंदे, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर | आर. वाय. सोनावणे, मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १ फेब्रुवारी, १९५०



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदची वाढती लोकसंख्या मर्यादित राखली पाहिजे.

लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाकडे व ती आटोक्यांत कशी ठेवावी या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष जावें तितकें गेलेलें दिसत नाहीं, व हें विधान विशेषतः हिंदसारख्या देशाला प्रामुख्यानें लागू पडतें. एका तज्ज्ञाच्या मतें जगाची लोकसंख्या १६४० सालीं फक्त ५० कोटी होती, व गेल्या वर्षी ती २३० कोटी झाली आहे. तीनशें वर्षांत हीं प्रचंड वाढ झाली व नवीन लागवडीस आलेले प्रदेश, औद्योगिक क्रांतीमुळें उत्पादनवाढ, वाहातुकीच्या साधनांत क्रांति व शास्त्रीय ज्ञानाची प्रगति, वाढता आंतरराष्ट्रीय व्यापार, शेतींत सुधारणा इ० गोष्टींमुळें ही लोकसंख्येची प्रचंड वाढ कशी-बशी शक्य झाली. परंतु याच प्रमाणांत लोकसंख्या वाढत गेल्यास यापुढें उत्पादनांत पूर्वीप्रमाणें प्रचंड वाढ होणें केव्हांहि शक्य नसल्यामुळें, विशेषतः राहाणीचें मान अगदीं खालच्या पातळींत असलेल्या आशिया खंडातील देशांवर आपत्ति कोसळल्यावाचून राहाणार नाहीं.

हिंदची लोकसंख्या सध्यां दरवर्षी १·२ टक्के किंवा ३२ लक्ष माणसें या प्रमाणांत वाढत आहे. आपल्या राहाणीचें मान गेलीं दोन वर्षें कमी होत चाललें आहे व अनेक प्रकारच्या आर्थिक संकटांमुळें उत्पादन विशेष प्रकारें वाढण्याची आज शक्यता दिसत नाहीं. आहे हेंच राहाणीचें मान कायम ठेवावयाचें असलें तरी उत्पादनांत दरवर्षी १·२ टक्के वाढ झाली पाहिजे. कांहीं दिवसापूर्वी सर विश्वेश्वरअय्या यांनीं एका भाषणांत लोकसंख्या मर्यादित राखण्या-च्या प्रश्नाकडे लक्ष वेधविलें आहे. त्यांनीं असें स्पष्ट शब्दांत सांगि-तलें कीं हिंदनें औद्योगिक उत्पादन-वाढीच्या प्रश्नाबरोबरच लोक-संख्या मर्यादित राखण्याच्या प्रश्नाकडे लक्ष दिलेंच पाहिजे. एका कुटुंबाला फार तर दोन मुलांची जबाबदारी स्वीकारतां येईल असें त्यांनीं सुचविलें. लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करतांना संख्येपेक्षां लोकांच्या आरोग्याच्या व बौद्धिक दर्जाकडे लक्ष दिलें पाहिजे. मुलें ही राष्ट्राची संपत्ति आहे, परंतु या संख्येंत हिंदमध्यें फार मोठी भर घातली जाते परंतु लोकसंख्येचा दर्जा काय आहे, या गोष्टीकडे लक्ष दिलें जात नाहीं. लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करतांना सरासरी आयुर्मर्यादा, दर हजारीं जन्म व मृत्यूंचें प्रमाण, बाल-मृत्यूंचें प्रमाण, रोगांच्या साथींचें प्रमाण, इ. गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. हिंदची दर माणशीं आयुर्मर्यादा सरासरी २३ वर्षें इतकी कमी आहे व जन्माला येणाऱ्या मुलांपैकीं ५० टक्के मुलें त्यांच्या वयाची पांच वर्षें पुरीं होण्यापूर्वीच मृत्युमुखीं पडतात.

लोकसंख्या मर्यादित ठेवण्याच्या प्रश्नाकडे मूठभर सुशिक्षित मध्यमवर्गीय लोकांचें लक्ष हिंदमध्यें गेलें आहे. साक्षर समाज १० टक्के आहे, व लोकसंख्येच्या प्रश्नाकडे फार तर २ टक्के लोकांचें लक्ष गेलें असावें. खरें सांगावयाचें म्हणजे या प्रश्नाकडे खेडेगांवांत राहणाऱ्या शेतावर काम करणाऱ्या लोकांचें व कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांचें लक्ष गेलें पाहिजे. अशा कुटुंबांत मुलांची संख्या फार मोठी असते असें सर्व ठिकाणीं आढळून येतें. साक्षरता व दारुबंदी हे प्रश्न जितके महत्त्वाचे आहेत तितकाच लोकसंख्या मर्यादित राखण्याचा प्रश्न अगदीं महत्त्वाचा आहे. सरकारनें व अनेक सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनीं या प्रश्नाकडे लक्ष दिलें पाहिजे. ब्रिटिश असोसिएशन फॉर अडव्हान्समेंट ऑफ सायन्स ह्या संस्थेच्या १११ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणांत नुकतीच सर जॉन रसेल यांनीं लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाची जागतिक पातळीवरून मार्मिक चर्चा केली; त्यावेळीं त्यांनीं आशियांतील राष्ट्रांच्या वाढत्या लोकसंख्येकडे लक्ष वेधविलें. व लोकसंख्या मर्यादित राखली पाहिजे असें सुचविलें.

## जपानच्या पुनर्घटनेसाठीं अमेरिकेचा प्रयत्न कां ?

युद्धापूर्वी जपाननें जागतिक व्यापारांत फार मोठें स्थान पटकावलेलें होतें. जपानच्या नियंत्रणाखालीं मोठाले प्रदेश होते. त्यांतून जपानला कच्चा माल स्वस्त मिळवतां येई आणि पक्का माल उठवतां येई. जपानजवळ मालवाहू बोटी पुष्कळच होत्या. त्यामुळें जपानी मालाची वहातूक कमी खर्चांत आणि परदेशी चलनाची आवश्यकता न भासतां जपानला करतां येई. मजुरीचे दर जपानमध्यें अगदीं कमी होते. जपानी औद्योगिक जीवन मूठभर संघटनांच्या हातीं होतें; कच्च्या मालापासून ते थेट विक्रीपर्यंतची व्यवस्था एकसूत्री असे. ह्या संघटनांच्या सहकार्या-मुळें व्यवहार स्वस्त व कार्यक्षम होई. आतां ह्या सर्व गोष्टी नाहींशा झाल्या आहेत. जपानच्या वसाहती उरल्या नाहींत. कोरिया, मंचुरिया, फोर्मोसा, इत्यादींपासून त्याला मिळणारा हुकमी फायदा बंद पडला आहे. त्याच्या आगबोटी बुडाल्या आहेत. मजुरांसंबंधीं कायदे, मजुरांचे संघ, इत्यादींमुळें मजुरीचा खर्च वाढत आहे. युद्धापूर्वी, परराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत जपानचा सर्व देशांत पांचवा अनुक्रम होता. परराष्ट्रीय व्यापारामुळें त्याला मिळणारें उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या १६·५% होतें; अमेरिकेंत तें ३·६% होतें. युद्धांतील पराभावामुळें जपानचा ह्या व्यापार संपुष्टांत आला आहे. पूर्वी जपान आशियांतून ५०% कच्चा माल आणी; अमेरिकेकडून २०% आणी; आतां ७८% साठीं जपान अमेरिकेवर अवलंबून आहे. पूर्वी जपान अन्नाचे बाबतींत साधारणपणें स्वयंपूर्ण होता. आतां जपानमध्यें होणाऱ्या आयातींपैकीं ४६% आयात अन्नधान्याची असते. अमेरिकेकडे जपानच्या पुनर्घटनेची जबाबदारी आली आणि ती पार पाडण्यासाठीं अमेरिकन नागरिकांना रोजचा १५ लक्ष डॉलर्स भुर्दंड द्यावा लागतो. जपानची भक्कम पायावर उभारणी केली नाहीं तर त्याची आर्थिक स्थिति पार बिघडून जाऊन तो चीनचें अनुकरण करील, ही अमेरिकेस भीति वाटत आहे. जपानी बेटांपुरता कोणताहि कार्यक्रम आंखला, तरी तो यशस्वी होणार नाहीं. चीन, वेस्ट इंडीज, फिलीपाइन्स, मलाया, भारत, इत्यादि देशांच्या आर्थिक जीवनाशीं जपानी आर्थिक जीवन निगडित असल्याकारणानें, ह्या सर्व प्रदेशांचीच नीट व्यवस्था केल्याविना एकट्या जपानची स्थिति सुधारणार नाहीं. जपानला अमेरिका दरसाल किती मदत देत रहाणार आणि दिली नाहीं तर अमेरिकेचें आजचें स्थान कसें टिकणार? आशियांतील देशांच्या भवितव्याकडे अमेरिकेचें इतकें लक्ष राहिलें आहे, त्याचें मर्म असें आहे. हा मोठा प्रदेश अमेरिकेच्या गटाचे हुकमतींतून बाहेर जाऊन कम्युनिस्ट बनेल, अशी भीति वाटत आहे आणि मग जगाचें नेतृत्त्व अमेरिकेकडे किंवा कोणत्याहि युरोपियन राष्ट्राकडे किंवा त्यांच्या गटाकडे राहूं शकणार नाहीं.

झिफ-डेव्हिस पब्लिशिंग कंपनीचे अध्यक्ष, बर्नार्ड डेव्हिस, ह्यांच्या पहाणीचा हा निष्कर्ष त्यांनीं प्रसिद्ध

# अर्थ

बुधवार, ता. १ फेब्रुवारी, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदची वाढती लोकसंख्या मर्यादित राखली पाहिजे.

लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाकडे व ती आटोक्यांत कशी ठेवावी या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष जावें तितकें गेलेलें दिसत नाहीं, व हें विधान विशेषत: हिंदसारख्या देशाला प्राधान्यानें लागूं पडतें. एका तज्ज्ञाच्या मतें जगाची लोकसंख्या १६४० सालीं फक्त ५० कोटी होती, व गेल्या वर्षी ती २३० कोटी झाली आहे. तीनशें वर्षात ही प्रचंड वाढ झाली व नवीन लागवडीस आलेले प्रदेश, औद्योगिक क्रांतीमुळें उत्पादनवाढ, वाहातुकीच्या साधनांत क्रांति व शास्त्रीय ज्ञानाची प्रगति, वाढता आंतरराष्ट्रीय व्यापार, शेतींत सुधारणा इ० गोष्टींमुळें ही लोकसंख्येची प्रचंड वाढ कशी-बशी शक्य झाली. परंतु याच प्रमाणांत लोकसंख्या वाढत गेल्यास यापुढें उत्पादनांत पूर्वीप्रमाणें प्रचंड वाढ होणें केव्हांहि शक्य नसल्यामुळें, विशेषत: राहाणीचें मान अगदीं खालच्या पातळींत असलेल्या आशिया खंडातील देशांवर आपत्ति कोसळल्यावाचून राहाणार नाहीं.

हिंदची लोकसंख्या सध्यां दरवर्षी १·२ टक्के किंवा ३२ लक्ष माणसें या प्रमाणांत वाढत आहे. आपल्या राहाणीचें मान गेलीं दोन वर्षें कमी होत चाललें आहे व अनेक प्रकारच्या आर्थिक संकटांमुळें उत्पादन विशेष प्रकारें वाढण्याची आज शक्यता दिसत नाही. आहे हेंच राहाणीचें मान कायम ठेवावयाचें असलें तरी उत्पादनांत दरवर्षी १·२ टक्के वाढ झाली पाहिजे. कांहीं दिवसापूर्वी सर विश्वेश्वरअय्या यांनीं एका भाषणांत लोकसंख्या मर्यादित राखण्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधविलें आहे. त्यांनीं असें स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं हिंदनें औद्योगिक उत्पादन-वाढीच्या प्रश्नाबरोबरच लोकसंख्या मर्यादित राखण्याच्या प्रश्नाकडे लक्ष दिलेंच पाहिजे. एका कुटुंबाला फार तर दोन मुलांची जबाबदारी स्वीकारतां येईल असें त्यांनीं सुचविलें. लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करतांना संख्येपेक्षां लोकांच्या आरोग्याच्या व बौद्धिक दर्जाकडे लक्ष दिलें पाहिजे. मुलें ही राष्ट्राची संपत्ति आहे, परंतु या संख्येंत हिंदमध्यें फार मोठी भर घातली जाते परंतु लोकसंख्येचा दर्जा काय आहे. या गोष्टीकडे लक्ष दिलें जात नाहीं. लोकसंख्येच्या प्रश्नाचा विचार करतांना सरासरी आयुर्मर्यादा, दर हजारीं जन्म व मृत्यूंचें प्रमाण, बालमृत्यूंचें प्रमाण, रोगांच्या साथींचें प्रमाण, इ. गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे. हिंदची दर माणशीं आयुर्मर्यादा सरासरी २३ वर्षें इतकी कमी आहे व जन्माला येणाऱ्या मुलांपैकीं ५० टक्के मुलें त्यांच्या वयाचीं पांच वर्षें पुरीं होण्यापूर्वींच मृत्युमुखीं पडतात.

लोकसंख्या मर्यादित ठेवण्याच्या प्रश्नाकडे मूठभर सुशिक्षित मध्यमवर्गीय लोकांचें लक्ष हिंदमध्यें गेलें आहे. साक्षर समाज १० टक्के आहे, व लोकसंख्येच्या प्रश्नाकडे फार तर २ टक्के लोकांचें लक्ष गेलें असावें. खरें सांगावयाचें म्हणजे या प्रश्नाकडे खेडेगांवांत राहणाऱ्या शेतावर काम करणाऱ्या लोकांचें व कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांचें लक्ष गेलें पाहिजे. अशा कुटुंबांत मुलांची संख्या फार मोठी असते असें सर्व ठिकाणीं आढळून येतें. साक्षरता व दारुबंदी हे प्रश्न जितके महत्त्वाचे आहेत तितकाच लोकसंख्या मर्यादित राखण्याचा प्रश्न अगदीं महत्त्वाचा आहे. सरकारनें व अनेक सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनीं या प्रश्नाकडे लक्ष दिलें पाहिजे. ब्रिटिश असोसिएशन फॉर अडव्हान्समेंट ऑफ सायन्स ह्या संस्थेच्या १११ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणांत नुकतीच सर जॉन रसेल यांनीं लोकसंख्येच्या वाढीच्या प्रश्नाची जागतिक पातळीवरून मार्मिक चर्चा केली; त्यावेळीं त्यांनीं आशियांतील राष्ट्रांच्या वाढत्या लोकसंख्येकडे लक्ष वेधविलें. व लोकसंख्या मर्यादित राखली पाहिजे असें सुचविलें.

## जपानच्या पुनर्घटनेसाठी अमेरिकेचा प्रयत्न कां ?

युद्धापूर्वी जपाननें जागतिक व्यापारांत फार मोठें स्थान पटकावलेलें होतें. जपानच्या नियंत्रणाखाली मोठाले प्रदेश होते. त्यांतून जपानला कच्चा माल स्वस्त मिळवतां येई आणि पक्का माल उठवतां येई. जपानजवळ मालवाहू बोटी पुष्कळच होत्या. त्यामुळें जपानी मालाची वहातूक कमी खर्चात आणि परदेशी चलनाची आवश्यकता न भासतां जपानला करतां येई. मजुरीचे दर जपानमध्यें अगदीं कमी होते. जपानी औद्योगिक जीवन मूठभर संघटनांच्या हातीं होतें; कच्च्या मालापासून ते थेट विक्रीपर्यंतची व्यवस्था एकसूत्री असे. ह्या संघटनांच्या सहकार्यामुळें व्यवहार स्वस्त व कार्यक्षम होई. आतां ह्या सर्व गोष्टी नाहींशा झाल्या आहेत. जपानच्या वसाहती उरल्या नाहींत, कोरिया, मंचुरिया, फोर्मोसा, इत्यादींपासून त्याला मिळणारा हुकमी फायदा बंद पडला आहे. त्याच्या आगबोटी बुडाल्या आहेत. मजुरांसंबंधीं कायदे, मजुरांचे संघ, इत्यादींमुळें मजुरीचा खर्च वाढत आहे. युद्धापूर्वी, परराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत जपानचा सर्व देशांत पांचवा अनुक्रम होता. परराष्ट्रीय व्यापारामुळें त्याला मिळणारें उत्पन्न एकूण उत्पन्नाच्या १६·५% होतें; अमेरिकेंत तें ३·६% होतें. युद्धांतील पराभावामुळें जपानचा हा व्यापार संपुष्टांत आला आहे. पूर्वी जपान आशियांतून ५०% कच्चा माल आणी; अमेरिकेकडून २०% आणी; आतां ७८% साठी जपान अमेरिकेवर अवलंबून आहे. पूर्वी जपान अन्नाचे बाबतींत साधारणपणें स्वयंपूर्ण होता. आतां जपानमध्यें होणाऱ्या आयातींपैकीं ४६% आयात अन्नधान्याची असते. अमेरिकेकडे जपानच्या पुनर्घटनेची जबाबदारी आली आणि ती पार पाडण्यासाठी अमेरिकन नागरिकांना रोजचा १५ लक्ष डॉलर्स भुर्दंड द्यावा लागतो. जपानची भक्कम पायावर उभारणी केली नाहीं तर त्याची आर्थिक स्थिति पार बिघडून जाऊन तो चीनचें अनुकरण करील, ही अमेरिकेस भीति वाटत आहे. जपानी बेटांपुरता कोणताहि कार्यक्रम आंखला, तरी तो यशस्वी होणार नाहीं. चीन, वेस्ट इंडीज, फिलीपाइन्स, मलाया, भारत, इत्यादि देशांच्या आर्थिक जीवनाशीं जपानी आर्थिक जीवन निगडित असल्याकारणानें, ह्या सर्व प्रदेशांचीच नीट व्यवस्था केल्याविना एकट्या जपानची स्थिति सुधारणार नाहीं. जपानला अमेरिका दरसाल किती मदत देत रहाणार आणि [illegible] दिली नाहीं तर अमेरिकेचें आजचें स्थान कसें टिकण[illegible] आशियांतील देशांच्या भवितव्याकडे अमेरिकेचें इतकें लक्ष [illegible] राहिलें आहे, त्याचें मर्म असें आहे. हा मोठा प्रदेश अ[illegible] गटाचे हुकमतींतून बाहेर जाऊन कम्युनिस्ट बनेल, अशी भीति वाटत आहे आणि मग जगाचें नेतृत्त्व अमेरिकेकडे[illegible] कोणत्याहि युरोपियन राष्ट्राकडे किंवा त्यांच्या गटाक[illegible] शकणार नाहीं.

झिफ–डेव्हिस पब्लिशिंग कंपनीचे अध्यक्ष, ब[illegible] डेव्हिस, ह्यांच्या पहाणीचा हा निष्कर्ष त्यांनीं प्रसिद्ध [illegible]

## कलकत्त्याची मुंबईविरुद्ध तक्रार

### रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांच्या निवासस्थानाची विक्री काय दर्शविते ?

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचें कलकत्ता येथील प्रासादतुल्य निवासस्थान विक्रावयास काढण्यांत आलें असून, त्यासाठीं टेंडरें मागविण्यांत आलीं आहेत. देशाच्या बँकिंगच्या व्यवहारांत ह्या निवासस्थानाला एक प्रकारचें विशिष्ट महत्त्व प्राप्त झालें होतें, ह्यांत कांहीं संशय नाहीं. अशा प्रकारचें प्रतीकात्मक महत्त्व पावलेली ही मालमत्ता ज्या अर्थी विक्रीस काढण्यांत आली आहे त्या अर्थी कलकत्ता शहराचें रिझर्व्ह बँकेच्या कारभारांतील स्थान कमी महत्त्वाचें होत चाललें असलें पाहिजे असा तर्क कलकत्ता येथें करण्यांत येत आहे. रिझर्व्ह बँकेसंबंधींचें बिल जेव्हां प्रथम कायदे-मंडळांत प्रविष्ट करण्यांत आलें त्यावेळीं सर्व देशाला बँकेचा उपयोग व्हावा; एकाद्या विशिष्ट गटाच्या अगर प्रांताच्या नियंत्रणाखालीं बँक जाऊं नये अशी दक्षता घेण्याविषयीं आतुरता दाखविण्यांत आली होती. ह्या दृष्टीनें बँकेच्या मुख्य कचेरीच्या ठिकाणाला फार महत्त्व होतें. म्हणून बँकेच्या गव्हर्नराचा मुक्काम निरनिराळया व्यापारी आणि प्रांतिक केंद्रांवर विभागण्यांत आला होता; विभागणींत त्या त्या केंद्राचें महत्त्व लक्षांत घेण्यांत आलें होतें. गव्हर्नरानें वर्षांतून ५ महिने मुंबईला, ५ महिने कलकत्त्याला, १५ दिवस मद्रासला आणि १५ दिवस रंगूनला रहावें अशी कल्पना होती. कलकत्त्याला बँकेच्या गव्हर्नराचें एक निवासस्थान ठेवण्यांत अशा प्रकारें एक प्रकारची योजना होती.

मुंबई आणि कलकत्ता ह्या दोन शहरांत रिझर्व्ह बँकेच्या कारभारांत वर्चस्व मिळविण्यासाठीं स्पर्धा चालू असे. ह्या स्पर्धेत [illegible]कत्त्याची हळूहळू माघारच होत गेली. बँकेच्या गव्हर्नराचें [illegible]स्थान विकण्याचा निर्णय ह्या स्पर्धेतील अखेरचा क्षण म्हणा-[illegible]त नाहीं. निवासस्थान रहाण्यास योग्य अशा स्थितींत [illegible]दर वर्षीं ७०,००० रुपये खर्च येतो. त्या ऐवजीं बँकेचा [illegible] कलकत्त्यास येईल त्यावेळीं त्याच्यासाठीं तात्पुरती जागा घेणें अधिक काटकसरीचें होईल असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. रिझर्व्ह बँक ही सर्व देशाच्या चलनाची विश्वस्त आहे; अशा संस्थेला रोख रकमेसाठीं वरील इमारत विकण्याची गरजच आहे असें मानणें जरा कठीणच आहे. तेव्हां बँकेच्या कारभारांत मुंबईचा जो वरचष्मा आहे, त्याच्या अनुरोधानेंच वरील निर्णयाची संगति लावणें प्राप्त आहे. रिझर्व्ह बँकेचे सर्व महत्त्वाचे व्यवहार मुंबईला चालतात. रिसर्च डिपार्टमेंट, अग्रिकल्चरल डिपार्टमेंट, फॉरिन् एक्स-चेंज कंट्रोल, इत्यादी सर्व शाखा मुंबईलाच आहेत. तथापि कलकत्त्याच्या दृष्टीनें असें म्हणतां येईल कीं व्यापाराचें प्रमुख केंद्र म्हणून त्याचें महत्त्व कधींही कमी होणार नाहीं. हिंदुस्थानच्या डॉलर्स मिळविण्याच्या आशा-अपेक्षा येथूनच उगम पावतात. डॉलर्स मिळविणारी मुख्य वस्तु जी ताग ती बंगालमध्येंच पैदा होते. शिवाय पैसा आणि त्याची गुंतवणूक ह्याबद्दलच्या कित्येक महत्त्वाच्या घडामोडी कलकत्त्यासच होतात. कलकत्त्याच्या तर्फे वरील प्रकारची तक्रार करण्यांत येत आहे.

---

### प्रो. काळे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण

कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण मुंबई सरकारचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या हस्तें शनिवार, ता. ४ फेब्रुवारी १९५० रोजीं पुणें सें. को. बँकेंत होणार आहे.

### कोल्हापूर येथील "दक्षिणची दौलत" प्रदर्शन

हें प्रदर्शन कोल्हापूर येथें भरविण्यांत येणार आहे. त्याची आंखणी ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअरच्या धर्तीवर करण्याचा चालकांचा विचार आहे. दक्षिणेंतील कारखानदारांच्या मालास परप्रांतांतून मागणी वाढेल अशा हेतूनें जाहिरात केली जाईल व दूरदूरच्या प्रांतांतून व्यापारी व कारखानदार वर्गांना निमंत्रणें दिलीं जातील व ते अगत्यपूर्वक हजर रहातील अशा सोई करण्यांत येतील. प्रदर्शनांत दक्षिणेंतील दौलतीचें यथायोग्य दर्शन घडवून आणण्यांत येईल व दक्षिणेंतील अनेक धंद्यांना हिरहिरीनें पुरस्कार केला जाईल. त्यांत कोयना धरण योजनेस अर्थातच महत्त्वाचें स्थान राहील. ता. २१ जानेवारी रोजीं कोल्हापूर येथें प्रमुख उद्योगपतींची सभा भरून त्यांत प्रदर्शनास आवश्यक तें भांडवल पुरविण्याची जबाबदारी पत्करणाऱ्या बोर्ड ऑफ प्रमोटर्सची उभारणी करण्यांत आली. ह्या बोर्डाचें अध्यक्ष-स्थान श्री. शं. वा. किर्लोस्कर ह्यांचेकडे आहे. प्रदर्शनाच्या मॅनेजिंग कमिटीचेहि ते अध्यक्ष असून श्री. एस. एम. घाटगे व श्री. एन. ए. तेंडूलकर हे जॉइंट ऑर्गनायझर्स आहेत. प्रदर्शन कोल्हापूर येथील रावणेश्वर मैदान येथें भरविण्यांत येईल व त्यास अंदाजें ६५ हजार रुपये खर्च येईल.

---

### शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत मोठी घट

डिसेंबर १९४८ अखेरच्या आकड्यांची डिसेंबर १९४९ अखेरच्या आकड्यांशीं तुलना केली असता, शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत बरीच मोठी घट झाल्याचें आढळून येतें. सुमारें १०० कोटी रुपयांनीं ठेवी घटल्या आहेत, म्हणजे एका वर्षांत त्या १०·७% कमी झाल्या आहेत. ह्यापैकी ७२½ कोटी रुपयांची घट करंट खात्यांतील ठेवींत झालेली आहे. खालील तक्ता पहा:—

| | ३० डिसें. | ३१ डिसें. | फरक |
|---|---|---|---|
| | (आकडे कोटी रुपयांचे आहेत) | | |
| 'डिमांड' ठेवी | ५६४·९० | ६३७·१८ | —७२·२८ |
| 'टाइम' ठेवी | २६८·४७ | २९६·६९ | —२८·२२ |
| एकूण ठेवी | ८३३·३७ | ९३३·८७ | —१००·५० |
| दिलेलीं कर्जें | ३९५·३५ | ४२२·७१ | —२७·४६ |

---

### डेक्कन बँक्स असोसिएशन

मंगळवार, ता. २४ जानेवारी रोजीं भरलेल्या सभेंत वरील असोसिएशनच्या घटनेचा व नियमांचा मसुदा संमत करण्यांत आला. असोसिएशन ही बँकांची संघटना होणार असल्यानें व्यक्तिशः कोणासहि तिच्यांत स्थान नाहीं. बँका ह्याच असोसिएशनच्या सभासद होतील व त्यांचे प्रतिनिधी असोसिएशनमध्यें जातील. प्रत्येक बँकेस एक प्रतिनिधी पाठवितां येईल व तो त्या बँकेचा विद्यमान डायरेक्टरच असला पाहिजे. म्हणजे, व्यवस्थापकांना असोसिएशनमध्यें स्थान दिलेलें नाहीं. प्रत्येक सभासद बँकेस १०० रु. प्रवेश फी व वार्षिक १०० रु. वर्गणी यावी लागेल. ह्या संघटनेतून महाराष्ट्रांतील बँकिंगच्या व्यवसायाच्या प्रगतीस हातभार लागेल व तो व्यवसाय अधिक सुसंघटित होईल, अशी अपेक्षा आहे.

## कॉमनवेल्थचें आणखी एका नव्या क्षेत्रांत पदार्पण

कॉमनवेल्थ विमा कंपनीनें गुरुवार ता. २६ जानेवारी १९५० ह्या प्रजासत्ताक भारताच्या निर्मितीच्या शुभदिवशीं विम्याची मिसलेनिअस शाखा ( मोटार, ॲक्सिडंट व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन विमा ) सुरू केली. त्यानिमित्त सायंकाळीं पानसुपारी समारंभ करण्यांत आला. कंपनीचे मॅ. डायरेक्टर श्री. श्री. म. जोशी व डायरेक्टर मंडळी सर्वांचें स्वागत करीत होतीं. पानसुपारीस कंपनीचे प्रमुख भागीदार, विमेदार व हितचिंतक मोठ्या संख्येनें आले होते. ह्या प्रसंगीं कंपनीनें विमाविषयक एक उद्बोधक प्रदर्शन मांडलें होतें, तें सर्वांना अत्यंत आवडलें. विवाह ठरण्यापासून वृद्धत्वापर्यंतच्या सर्व अवस्थांस विमा किती उपयोगी पडूं शकतो, हें त्यांत चित्रांच्या अनुरूप मांडणीनें दाखविण्यांत आलें होतें. त्याचप्रमाणें, विमा न उतरल्यामुळें येणाऱ्या आपत्तींचेंहि चित्रण केलेलें होतें. विमा अर्जापासून क्लेमच्या चेकपर्यंतचा इतिहासहि टेबलावर आकर्षक रीतीनें मांडलेला होता. विमा एजंट कसा असावा, ह्याचीहि चित्रें चांगली होतीं. कल्पना, योजना, चित्रें व त्याखालील मोजक्या शब्दांतील परंतु परिणामकारक मजकूर, हीं सर्वच उत्कृष्ट साधलीं होतीं. त्यामुळें प्रदर्शन हें पानसुपारी समारंभाचें मोठेंच आकर्षण झालें होतें आणि समारंभास आलेल्या स्त्रियांचें त्यानें चांगलेंच लक्ष वेधलें होतें. विम्याचें महत्त्व विशेषतः स्त्रियांना पटवून देण्यास अशा प्रदर्शनांचा उत्कृष्ट उपयोग होईल आणि त्यामुळें विम्याचा प्रसार अधिक होऊं शकेल, हें प्रदर्शनानें सिद्ध केलें आहे. कंपनीचे सेक्रेटरी श्री. ह. वि. कितने ह्यांनाच ह्या प्रदर्शनाचें मुख्य श्रेय दिलें पाहिजे.

१९२८ सालीं स्थापन झालेल्या कॉमनवेल्थची प्रारंभींची कौतुकास्पद प्रगति, त्यानंतर १९४० ते १९४७ हा संकटाचा काळ, त्यांतून बाहेर पडण्याची संचालक मंडळानें बजावलेली कामगिरी, दैनंदिन कारभारांत केलेली सुधारणा व काटकसर, भागीदारांनीं कंपनीबाबत दाखवलेला विश्वास आणि सहानुभूति; १९४६ अखेरच्या कडक मूल्यमापनांत झालेला नफा, विमेदारांना नफा देण्यास झालेला प्रारंभ, मुंबई येथें मोठ्या इमारतीची खरेदी, इतर कंपन्यांचें काम घटत असतांना विम्याचे कामांत १९४९ मध्यें झालेली मोठी वाढ, इत्यादि गोष्टींचा इतिहास अगदीं ताजा आहे. १५ ऑगस्ट १९४८ रोजीं कंपनीनें आगीच्या कामास प्रारंभ केला आणि त्या क्षेत्रांतहि कंपनीस जनतेचा चांगला पाठिंबा मिळत आहे. यानंतर होणाऱ्या मूल्यमापनांत कंपनी विमेदारांना व भागीदारांना नफा वाटूं शकेल असा डायरेक्टरांना आत्मविश्वास वाटत आहे. कंपनीच्या नव्या कामांच्या शाखेचीहि भरभराट होऊन आणि तिला भारतीय श्रेष्ठ कंपन्यांचे पंक्तीस मानाचें स्थान सत्वर मिळेल अशीच अपेक्षा आहे.: कंपनीचे मॅ. डायरेक्टर श्री. श्री. म. जोशी ह्यांच्या परिश्रमाचें उत्कृष्ट चीज होत आहे, ह्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

**जर्मन रेल्वे एंजिनांची स्पर्धा**—१९५० मध्यें जर्मन रेल्वे एंजिनांची स्पर्धा ब्रिटिश कारखानदारांना चांगलीच जाणवूं लागेल अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. जर्मन कारखान्यांचीं एंजिनें मागणी नोंदविल्यापासून ९ महिन्यांत मिळूं शकतात, तर ब्रिटिश एंजिनें मिळण्यास दोन वर्षे लागतात. त्यांची किंमतही कमी असते. जर्मन रेल्वे कारखानदारांची स्पर्धा ब्रिटनला दक्षिण अफ्रिकेंत आणि हिंदुस्थानांतहि जाणवूं लागली आहे.


### दि होप कंपनी लि.

९१७ सदाशिव, पुणें २.

सावण कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

मोठ्या ठेवीदारांस विशेष सवलत व भागीदारी.

ठेवीचे दर

३ वर्षे ५% ५ वर्षे ६%

*अधिक चौकशीसाठीं समक्ष भेटावें.*

एस. बी. जोगळेकर
मॅ. डायरेक्टर.



### अर्थ

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंकः २ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ताः–

"अर्थ"
*"दुर्गाधिवास"* पुणें ४.



### बांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल, जि. कुलाबा.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. | ४७,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ५०,००,००० |

शाखा

मुंबईः–६५।६७ झव्हेरी बझार. | पुणेंः–१२६८ भवानी पेठ.
अहमदनगरः–बझार पेठ. | बेलापूररोडः–पोस्टासमोर,
कल्याणः–शिवाजी चौक. | भिवंडीः–बझार पेठ.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया, अध्यक्ष.

" " केशरचंद आनंदराम बांठिया.
" " खिवराज आनंदराम बांठिया.
" " बिरदीचंद भूरचंद बांठिया.
" " चुनिलाल जसरूप मुनोथ.
" " रवजी भिमजी रंगपरिया.(ऑ.मॅजिस्ट्रेट.)

*श्रीमंत गंगाधर विष्णु ऊर्फ नानासाहेब पुराणिक.
श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल., बी. वकील, पनवेल.
" जे. एस. कासट बी. कॉम.
" एस. आर. घासवा
" ताराचंद दगडू भंडारी का व्यापारी, अहमदन

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

*विशेष माहितीसाठीं मुख्य कचेरीस अगर शाखांस*

जी. बी. साठे, जनरल मॅनेजर.

## स्वतंत्रता मिळविण्यासाठीं तात्पुरत्या नवऱ्यांची खरेदी

### विवाह आणि काडीमोड ह्यांचा व्यवहार करणाऱ्या संस्था

रुमेनिया, बल्गेरिया, हंगेरी, चेकोस्लोव्हाकिया, इत्यादि रशियाच्या दडपणाखालील देशांतील स्त्रिया तेथून बाहेर पडण्यासाठीं परदेशीयांशीं विवाहबद्ध होण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा विवाहांमुळें त्यांना पासपोर्ट मिळून त्या पॅरिस, रोम, स्टॉकहोम, लंडन, न्यूयॉर्क, इत्यादि ठिकाणीं पोंचतात व घटस्फोट घेऊन मोकळ्या होतात. ह्या कामीं त्यांना मदत करण्यासाठीं विवाह संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. ह्या संस्थांचे पश्चिम युरोपांतील देशांतून एजंट असतात. रशियाच्या दडपणाखालील देशांत येणाऱ्या लोकांची माहिती ते आगाऊच मिळवून, "तुम्हांला प्रवासखर्च फुकटांत पाडावयाचा आहे काय ? आणखी वरती पॉकेट-मनीहि मिळवायची आहे काय ?" असें त्यांस विचारतात. अस्तिपक्षीं उत्तर आलें, म्हणजे त्या प्रवाशास सूचना दिल्या जातात. प्रागमध्यें ठराविक दिवशीं, ठराविक होटेलांत, ठराविक वेळीं एजंट भेटेल. तेथें तो एका मुलीची ओळख करून देईल. तिचेशीं विवाह करावयाचा. विवाहविधि, पत्नीचा पासपोर्ट, दोघांची वहातूक आणि अखेर काडीमोड ह्यांची सर्व व्यवस्था विवाह संस्थेमार्फत केली जाते.

अर्थात् हें सर्व कांहीं अगदीं सोपें नसतें. चोरून करावें लागतें. विवाह करून काडीमोड घेऊं इच्छिणाऱ्या स्त्रिया सधन असाव्या लागतात आणि त्यांचा पैसा कम्युनिस्टांच्या आंवाक्याबाहेर असला तरच त्याचा उपयोग होऊं शकतो. तरीपण हजारों स्त्रियांनीं ह्या पद्धतीनें स्वातंत्र्य मिळविलें आहे. तात्पुरत्या नवऱ्यांच्या पुरवठ्यापेक्षा विवाह-काडीमोड इच्छिणाऱ्या स्त्रियांची संख्या मोठी असल्यामुळें विवाह संस्थांचा धंदा जोरांत चालू आहे.

### "चित्रमयजगत्"चा ४१ व्या वर्षाचा खास अंक

चित्रमयजगत्चा जानेवारी, १९५० चा अंक हा स्वतंत्र भारताचें ध्येयदर्शन खास अंक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला असून २६ जानेवारीच्या ऐतिहासिक प्रसंगाच्या निमित्तानें त्यांत स्वतंत्र भारताचें ध्येयदर्शन सुस्पष्ट रीतीनें घडविण्यांत आलें आहे. भारताच्या राज्यघटनेचें सुबोध सार श्री. त्र्यं. र. देवगिरीकर ह्यांनीं दिलें आहे, तें उद्बोधक आहे. अधिकारी लेखकांच्या विचारप्रवर्तक आणि माहितीपूर्ण लेखांनीं विशेषांक परिपूर्ण आहे. पंडित नेहरूंच्या अनेक छायाचित्रांमुळें अंकाची आकर्षकता फारच वाढली आहे. अंकाची मांडणीहि चांगली आहे. अशा रीतीनें हा विशेषांक उच्च दर्जाचा झाला आहे. (वर्ष ४१, अंक १ ला. पृ. सं. ९६. खास अंकाची किं. १ रु. वा. व. ५ रु. संयोजकः त्र्यं. र. देवगिरीकर. संपादकः रा. प्र. कानिटकर.)

### ब्रिटनमधील रेशनची सूक्ष्म तपासणी

मिसेस जॉईस फिशर हिला पुरे महिने भरण्यापूर्वीच मुलगी झाली, तेव्हां मुलीचें वजन ४ पौंड होतें. ११ महिन्यांनीहि तिचें वजन वयाच्या मानानें कमीच राहिलें. तिला डॉक्टरानें दर आठवड्यास १८ औंस साखर मिळावी, अशी शिफारस केली; नेहमीचें रेशन ८ औंसांचें आहे. मिसेस फिशरनें अन्नखात्याकडे ह्या जादा साखरेसाठीं मागणी केली. "पुरे महिने भरण्यापूर्वी जन्माला येणाऱ्या कमी वजनाच्या मुलांना जादा साखर आवश्यक नाहीं, असा आमच्या डॉक्टरांचा सल्ला आहे," असें कारण देऊन अन्न खात्यानें साखरेचें जादा रेशन नाकारलें.

### मुंबई प्रांतांतील अर्बन व मध्यवर्ती बँका

मुंबई प्रांताच्या २० जिल्ह्यांत ५ हजारावरील लोकवस्तीचीं २८६ गांवें आहेत. ह्या २८६ गांवांपैकीं १२५ गांवांत एकहि बँक नाहीं, म्हणजे एकहि व्यापारी बँक किंवा १ लाखावर शेअर भांडवल व रिझर्व्ह असलेली सहकारी बँक नाहीं. १ लाखाखालील भांडवलच्या व रिझर्व्हच्या लहान अर्बन बँका कांहीं गांवांतून आहेत. उरलेल्या १६१ गांवांपैकीं ८१ गांवांत व्यापारी आणि सहकारी दोन्ही प्रकारच्या बँका आहेत, ८० गांवांत फक्त सहकारी बँका आहेत. वरील ८१ गांवांत व्यापारी आणि सहकारी बँकांच्या मिळून ४९९ कचेऱ्या आहेत आणि उरलेल्या ८० गांवांत सहकारी बँकांच्या १०५ कचेऱ्या आहेत. सर्व अर्बन बँका आणि सोसायट्या ह्यांचेबाबत आकडे उपलब्ध नाहींत. परंतु महत्त्वाच्या १२८ अर्बन बँकांबाबत माहिती येथें दिली आहे:—

| अर्बन बँकांची संख्या | वसूल भांडवल | रिझर्व्हज | ठेवी | कर्जें | खेळतें भांडवल |
|---|---|---|---|---|---|
| १२८ | १ ११,७३,६०० | ९६,४०,२०० | ९,९५,४१,१०० | ५,३३,८३,२०० | १३,०४,५५,१०० |

त्याचप्रमाणें मध्यवर्ती बँकांबाबत आकडे खालीं दिले आहेत, त्यांत प्रांतिक बँका व बँकिंग यूनियन्स ह्यांचाहि समावेश होतो. ह्या १८ संस्थांच्या १५१ शाखा आहेत:—

| बँकांची संख्या | वसूल भांडवल | रिझर्व्हज | ठेवी | कर्जें | खेळतें भांडवल |
|---|---|---|---|---|---|
| १८ | ९८,७३,९०० | ८१,१२,४०० | १५,११,८४,००० | १०,१६,४९,००० | २१,०४,०६,००० |

### कापसाच्या पिकाचा दुसरा अंदाज

भारतांत १९४९-५० सालीं कापसाच्या पिकाची लागवड ८६ लक्ष, ३७ हजार एकर जमिनींत झाली असावी असा शेतकी खात्यांतील अर्थ व आंकडेवारी विभागाचा त्या पिकाबाबतचा दुसरा अंदाज आहे. हाच आंकडा १९४८-४९ सालीं ८२ लक्ष, ४१ हजार होता. यावरून यंदाचे वर्षी ४.८ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येतें. या कापसाचे प्रकार पुढीलप्रमाणें आहेत:—

| | | |
|---|---|---|
| बंगाली | ६,४३,००० | एकर |
| अमेरिकन | २,२१,००० | एकर |
| उमरस | ३९,५८,००० | एकर |
| भडोच | ४,४७,००० | एकर |
| सुरती | १,१४,००० | एकर |
| धोरेला | ५,५४,००० | एकर |
| इतर | २७,००,००० | एकर |

सध्या पिकाच्या लागवडींत विशेषतः मुंबई, मद्रास, मध्यप्रांत आणि वऱ्हाड, मध्यभारत आणि सौराष्ट्र या ठिकाणीं वाढ झाली असून तिला पेरणीच्या हंगामाचे वेळचें अनुकूल हवामान कारणीभूत आहे. हा अंदाज साधारणपणें १९४९ च्या सप्टेंबर अखेरपर्यंतचा आहे. या वेळेपर्यंत पीक एकंदरींत समाधानकारक असल्याचें वृत्त आहे.

## जागतिक आर्थिक परिस्थिति

( मा. म. काळे. )

गेली सात आठ वर्षे जागतिक आर्थिक परिस्थिति बरीचशी अमेरिकेच्या धोरणावर अवलंबून आहे हें अगदीं उघड आहे. अमेरिकेचें याबाबतीतलें वर्चस्व १९४१ पासून सर्वांना मान्य असलें तरी वस्तुतः १९२९ सालीं सुरू झालेली जागतिक मंदी बरीचशी अमेरिकेच्याच व्यापारी व औद्योगिक धोरणाचा परिणाम होय हें लक्षांत असलें पाहिजे. सध्यां तर सोव्हिएट रशिया वगळून बाकीचें जग बरेंचसें अमेरिकेच्या वर्चस्वाखालीं आहे. अटलांटिक करार, मार्शल योजना, जपानबद्दलचें धोरण, मागासलेल्या राष्ट्रांकरतां मदतीची योजना ह्या सर्व गोष्टी अमेरिकेचें महत्त्व दाखवितात. प्रत्यक्ष व्यापारी जगांत गहूं, कापूस, व रबर ह्या तीन पदार्थांच्या बाबतींतलें अमेरिकेचें धोरण इतर अनेक देशांवर परिणाम करणारें ठरतें. डॉलरचें वर्चस्व, सप्टेंबर १९४९ पासून इंग्लंडप्रभृति निरनिराळ्या २४ राष्ट्रांनीं आपल्या चलनाच्या उतरविलेल्या किंमतीवरून, स्पष्टपणें व्यक्त होतें.

गेल्या वर्षी सुरवातीला अमेरिकेंत मंदी सुरू होते कीं काय अशी भीति निर्माण झाली होती, परंतु मंदी सुरू झालेली नाहीं व ती इतक्यांत सुरू होईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं असें स्पष्ट झालें आहे. याचा इतर देशांवर अनुकूल परिणाम झाला आहे. मंदी आलीच तर तिचे परिणाम शक्य तितके कमी जाचक व्हावेत या दृष्टीनें आर्थिक धोरणाचीं चक्रें खुद्द अमेरिकेकडून व इतर देशांकडून हालविलीं जातील. १९२९ च्या मंदीचा अनुभव व युद्धकालीन नियंत्रणांमुळें मिळालेला अनुभव या बाबतींत मार्गदर्शक ठरणार आहे.

निरनिराळ्या देशांतील धान्याचें उत्पन्न वाढत असल्यामुळें व कांहीं देशांचे प्रयत्न विशेष प्रकारांनीं अन्नाचे बाबतींत स्वयंपूर्ण बनण्याचे असल्यामुळें एकंदर जागतिक अन्नपरिस्थिति सुधारण्याच्या मार्गावर आहे. अन्नपरिस्थितीची जाणीव गेलीं दोन वर्षे जगांतील देशांना जितकी झाली आहे तितकी यापूर्वी केव्हांहि झालेली नव्हती ही निश्चित आशाजनक गोष्ट दिसते. मार्शल योजनेमुळें पश्चिम युरोपांतील देशांची एकंदर उत्पादनाची परिस्थिति सुधारत आहे, व स्टर्लिंगमधील पौंड व इतर चलनांच्या अवमूल्यनामुळें निरनिराळे देश आपली आर्थिक परिस्थिति सुधारण्याचे विशेष प्रकारें प्रयत्न करूं लागले आहेत हें एक सुचिन्ह होय. युद्धकाळांत अनेक व्यापारी जहाजें बुडविलीं गेल्यामुळें आंतरराष्ट्रीय वहातूक बरीच कमी झाली होती तीहि आतां जवळ जवळ पूर्वीप्रमाणें सुरू झाली आहे. विक्रेत्यांची बाजारपेठ बहुतेक मालाच्या बाबतींत बंद पाडून खरेदी करणारांची बाजारपेठ सुरू झाली आहे. हवाई वाहातूक फार वेगानें वाढत आहे. आशियांतील अनेक राष्ट्रें स्वतंत्र बनल्यामुळें एशियाटिक राष्ट्रांना महत्त्व येत आहे. ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाचें स्वरूपहि बदलत्या कालानुसार बदलत आहे. जागतिक बँकेनें औद्योगिक योजनांसाठीं जास्त देशांना गेल्या वर्षी कर्जे दिलीं आहेत. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या कार्याचा पसाराहि वाढत आहे. जपानचें औद्योगिक पुनरुज्जीवन झालें आहे, व जर्मनीची परिस्थिति थोडीशी सुधारत आहे. वास्तववादी आर्थिक कार्यक्रमांवर निरनिराळ्या देशांकडून भर दिला जात आहे.

अशा प्रकारच्या साधारण आशाजनक परिस्थितींत काळजी करण्यासारख्या दोन गोष्टी दिसतात. त्या म्हणजे कॉम्युनिस्टांचें वाढतें यश, व झपाट्यानें वाढत जाणाऱ्या लोकसंख्येकडे जनतेचें जावें तितकें लक्ष गेलेलें नाहीं. जेथें दारिद्र्य जास्त त्या ठिकाणीं कॉम्युनिस्टांचा प्रचार सहज यशस्वी होतो. या दृष्टीनें राहाणीचें मान सुधारण्याचे प्रयत्न मागासलेल्या देशांत जितके जलद केले जातील तितकें आवश्यक आहे. भांडवलशाही समाजरचनेंतील चांगल्या गोष्टी व शेतकरी-मजूर वर्गाला किमान हक्क व आर्थिक जीवनाची शाश्वति या गोष्टी साध्य झाल्यास कॉम्युनिझमच्या फैलावाला सहजच आळा बसेल.

---

## चलनवृद्धीचा राक्षस

### जगाचा नाश करणार

सिलोनचे ब्रिटनमधील हायकमिशनर सर ऑलिव्हर गुणतिलक ह्यांचें लंडन येथील रॉयल एम्पायर सोसायटीपुढें नुकतेंच एक महत्त्वाचें भाषण झालें. आग्नेय आशियांतील आर्थिक परिस्थिति आणि जगावर होणारे तिचे संभाव्य परिणाम ह्याबद्दल त्यांनीं आपल्या भाषणांत भयसूचक उद्गार काढले.

सर ऑलिव्हर म्हणाले. "अशी भीति वाटते कीं तीन किंवा चार वर्षांत आग्नेय आशिआ जगाला आर्थिक मंदीच्या खड्ड्याकडे नेईल. ह्या आर्थिक मंदीची खोली पूर्वी कधींही दृष्टीस पडली नव्हती इतकी असण्याचा संभव आहे. त्यावेळीं पश्चिमेकडील राष्ट्रें जागी होतील; परंतु इतक्या उशिरां जागे होण्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. आतांच उशीर झाला आहे. अमेरिकेनें चढ्या किंमती ठेवण्याचें जें धोरण स्वीकारलें आहे त्यामुळें आग्नेय आशिआ भुकेकंगालपणाच्या कड्यावर आल्याशिवाय रहाणार नाहीं. ऑस्ट्रेलिआहि अमेरिकेच्या धोरणाचेंच अनुकरण करीत आहे. ऑस्ट्रेलिआंतील रहाणीचा खर्च मुळींच वाढला नसता गव्हाची किंमत ४० टक्के कां वाढविण्यांत आली तें समजत नाहीं. आग्नेय आशिआंत आज सर्व गोष्टींवर एकसारख्या महागत जाणाऱ्या अन्नधान्यांच्या किंमतीची सांवली पडलेली दिसते. पाश्चिमात्य राष्ट्रांनीं कितीही कुशलता दाखविली आणि कितीही पैसा पुरविला तरी चलनवृद्धि आटोक्यांत येणार नाहीं. चलनवृद्धीचा हा राक्षस प्रथम आग्नेय आशियाचा आणि नंतर सर्व जगाचा नाश करील.

"ह्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला म्हणजे, आग्नेय आशिआंत कम्युनिझमशीं मुकाबला करण्याचे कार्यक्रम सत्य दडवून ठेवण्यासाठीं पुढें केलेली एक सबब आहे असें वाटल्याखेरीज रहात नाहीं. आग्नेय आशिआंतील कम्युनिझम हें अज्ञान, दारिद्र्य आणि रोगराई, ह्यांचें अपत्य आहे. कम्युनिझमशीं लढाई देण्याचें घोषवाक्य सोडून देऊन दारिद्र्याशीं दोन हात करण्याचें घोषवाक्य पुढें ठेवणें जरूर आहे."

—×—

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार
ढमढेरे बो[illegible]
पु[illegible]

## बँकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पगाराची गुप्तता कां ?

ऑल इंडिआ इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल ( बँक डिस्प्यूट्स ) पुढें बँका आणि त्यांचे कनिष्ठ नोकरवर्ग ह्यांच्यांतील तंटा निवाड्यासाठी मांडण्यांत आला आहे. बँकांच्या कनिष्ठ नोकरवर्गातर्फे अशी मागणी करण्यांत आली कीं, बँकांच्या वरिष्ठ प्रतीच्या नौकरांसकट सर्वांना पगार किती मिळतो, महागाई भत्ता किती मिळतो, घरभत्ता व इतर भत्ते किती मिळतात ह्या संबंधींची माहिती एका ठराविक तक्त्याप्रमाणें देण्यांत यावी. ही माहिती कनिष्ठ वर्गातील नौकरांसाठीं जीवनवेतन ठरविण्यासाठीं आणि सर्व बँकांतून पगाराबाबत एकसारखें धोरण ठरविण्यासाठीं अवश्यक आहे असें श्री. एन्. व्ही. फडके ह्यांनीं सांगितलें. श्री. फडके हे असेंहि म्हणाले कीं, कमी प्रतीच्या नौकरांबाबत बँकांचें धोरण अनुदार आहे आणि वरिष्ठ प्रतीच्या नौकरांबाबत प्रमाणाबाहेर सढळ आहे असा समज रूढ आहे.

सर जमशेटजी कांगा ह्यांनीं असें सांगितलें कीं ट्रायब्यूनलनें दिलेल्या निवाड्याप्रमाणें पगाराची श्रेणी देण्यास आम्ही असमर्थ आहोंत हा मुद्दा बँकांतर्फे मांडण्यांत येणार नाहीं. तेव्हां वरिष्ठ प्रतीच्या नौकरांच्या पगाराबाबत मागविलेली माहिती गैरलागू आहे. शिवाय ती फार गुप्त स्वरूपाचीही आहे. बँकांचा वरिष्ठ नोकरवर्ग ट्रायब्यूनलच्या कक्षेंत येतो कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. त्याच्या पगाराविषयींची माहिती जाहीर करण्यांत आली तर नौकरवर्गांत आपसांत भांडणें सुरू होतील. ट्रायब्यूनलचे अध्यक्ष जस्टिस सेन ह्यांनीं अशी पृच्छा केली कीं, अशी माहिती देण्यांत काय अडचण आहे ? आपल्या गव्हर्नर–जनरलचा पगार आपणा सर्वांना माहीत आहे. पण त्यामुळें आपणांत भांडणें झाल्याचें दिसत नाहीं.

ह्यावर उत्तर म्हणून सर जमशेटजी कांगा म्हणाले कीं राज्यप्रमुखाचा पगार ही फार वेगळी बाब आहे. बँकांचे कांहीं वरिष्ठ नोकर करारप्रमाणें नोकरी करीत आहेत. त्यामुळें त्यांचे पगार आणि इतर नोकरांचे पगार ह्यांचा कांहीं संबंध नाहीं.

अखेर, ज्या बँका ट्रायब्यूनलच्या निवाड्याप्रमाणें पगार देण्याची असमर्थता पुढें आणणार नाहींत त्यांनीं वर मागितलेली माहिती दिली नाहीं तरी चालेल असें कनिष्ठ नौकर–वर्गाचे वकील श्री. एन. व्ही. फडके ह्यांनीं कबूल केलें. परंतु बँकांनीं आपला पूर्वीचा निर्णय बदलून सध्यापेक्षा अधिक पगार देणें आपल्याला परवडणार नाहीं असें ट्रायब्यूनलपुढें सांगितलें. फक्त परदेशी बँकांनीं आपण अधिक पगार देऊं शकूं असें सांगितलें. ज्या बँकांनीं आपली असमर्थता व्यक्त केली त्यांनीं आपल्या वरिष्ठ नोकरवर्गाला देण्यांत येणाऱ्या पगाराची व भत्याची माहिती १ फेब्रुआरी पर्यंत द्यावी असा हुकूम ट्रायब्यूनलनें दिला आहे.

### कॅलेंडरांची साभार पोंच

( १ ) डनलॉप रबर कंपनी, मुंबई ( मंगेश मोटार कं. मार्फत )
( २ ) ट्रियो आणि कं., फर्निचरचे कारखानदार पुणें २
( ३ ) के. टी. डोंगरे आणि कं. "डोंगर बालामृत" मुंबई ४
( ४ ) सोवनी, " सायन्स का सामान बनानेवाले, " मुंबई ४
( ५ ) बेंगाल कोल सप्लाईंग फर्म, बुधवार, पुणें २
( ६ ) यु. किं. हाय कमिशनर, मुंबई.
( ७ ) सुप्रीम म्युच्युअल विमा कं. लि., पुणें.




# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. पोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. इ. खोले.
श्री. बं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एल्एल्. बी.
श्री. बा. ग. पंचुरे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्ष मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी ५१५ बुधवार

अधिक माहितीसाठी लिहा. रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. ) मॅनेजर.







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.